# बंदिस्त कुक्कुटपालन - स्वंय रोजगाराचे साधन

मी एक भूमिहीन कुटूंबातील व्यक्ती असून माझ्या कुटूंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन रोजमजूरी हा आहे. एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशने अंतर्गत पोषणा करीता कृषी पध्दती प्रकल्पातील कार्यकर्त्यांनी मला बंदिस्त कुक्कुटपालन या विषयी माहिती दिली. कोंबडीपालन व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले व माहिती दिली की रोजच्या आहारात प्रथिने कसे उपलब्ध होतील. ते अंडी, चिकन, दाळवर्गीय, आयरनयुक्त पोषण भाजीपाला खाल्यास नक्कीच कुपोषण दूर होवू शकते याविषयांची माहिती मला मिळाली व मी कुक्कुटपालन व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला.

वर्ष २०१६ ला मला ५० टक्के सहभाग तत्वावर मला १५ दिवसांचे पक्षी एकुण १६ पक्षी वनराज, गिरीराज, स्वर्णधारा व आर आय आर जातीचे मिळाले. सोबत ३x२ फुट साईजचे लोखंडी केज मिळाले पक्षी ठेवण्याकरिता. तसेच पक्षांकरिता सोबत २५ किलो खाद्य मिळाले. असे संपूर्ण पॅकेज मला रू. १५००/- सहभाग करून मिळाले.



बंदीस्त कुक्कुटपालन यास फार वेळ देण्याची गरज नाही. परंतु त्याचे योग्य संगोपन, देखरेख, खाण्याचे खाद्य, शुद्ध पाण्याची व्यवस्था, साफसफाई, योग्य वेळी लसीकरण या गोष्टी करणे गरजेचे आहे. याची मी पुरेपुर काळजी घेतली.

५-६ महिन्यांनी कोंबडीचे अंडी चे उत्पादन सुरू झाले एकुण १६ पक्षी पैकी ७ मादी व ६ पक्षी नर झाले. कोंबडीचे अंडी सुरू झाल्यामुळे घरच्या रोजच्या खाण्यात अंडी येवू लागली. शिल्लक अंडी मी गावात व इतर बाहेरील व्यक्तींना रू. १०/- प्रती अंडी या प्रमाणे विकत असतो. त्यामुळे माझ्या कुटूंबांला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. प्रती माह १००० ते १५०० रू. उत्पन्न मिळायला लागले.

मी वनराज, गिरीराज व सुवर्णधारा या जातीचे अंडी गावराणी कोंबडी ठेवून दुसरी बॅच देखील घरीच नविन तयार केली आहे. कुक्कुटपालन करीता मला एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन व महाराष्ट्र पशु व मत्स्य विभाग (माफसू) नागपूर यांच्याद्वारा वेळोवेळी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणांचा व सरकारी पशुवैद्यकीय अधिकारी यांचा लसीकरणांचा वेळोवेळी लाभ झाला.

आता मीच स्वतः बंदीस्त कुक्कुटपालन याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी बाहेर ठिकाणी देखील जात असतो. माझा कुक्कुटपालन हा व्यवसाय बघून गावातील इतर शेतकऱ्यांनी देखील कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला आहे.



नाव : डोमाजी भोयर
गाव : सहेली, ता. आर्वी, जि. वर्धा
वय : ५६ वर्षे
जात : गोवारी
व्यवसाय : बंदीस्त कोंबडीपालन
कुटूंब संख्या : २ (मोठे)

Written by **Manoj R. Sayre,**
Senior Technical Assistant,
FSN study under LANSA.

LANSA Leveraging Agriculture for Nutrition in South Asia | MSSRF